भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ –२७: साप्ताहिक नववा पीक सल्ला
# (कालावधी ०६ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०२६)

## अ. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण सूचना

**कापसाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे संतुलित पोषण, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करून एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.** पीक वाढीच्या सर्व टप्प्यांमध्ये एकात्मिक पीक व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास पिकाची वाढ जोमदार होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि कीड व रोगांमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येते.

### मृदा आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन- INM)

- **प्रमुख अन्नद्रव्यांच (NPK) संतुलित व्यवस्थापन**:
  जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत वापर ई. तसेच आच्छादन पिकांचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी मातीची तपासणी करून त्यानुसार रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करा:** जस्त, बोरॉन, मँगनीज आणि मॅग्नेशियम यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास आवश्यकतेनुसार लक्ष्यित पर्णीय फवारणीद्वारे ती दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (एकात्मिक रोग व्यवस्थापन - आयडीएम)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करा**:
  जमिनीद्वारे पसरणारे तसेच पर्णभागावरील रोगकारकांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये शेताची योग्य स्वच्छता राखणे, तसेच बियाणे व मृदा प्रक्रियेसाठी जैविक कीटकनाशके (बायोपेस्टिसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा वापर करावा. यामुळे पिकांची सशक्त वाढ होण्यास मदत होते व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यास सहाय्य होते.
- **पांनांवरील रोगांचे नियंत्रण:**
  हवेतील आर्द्रता जास्त असलेल्या कालावधीत शेताची नियमित पाहणी करावी. रोगाच्या जलद वाढीस व प्रसारास अनुकूल हवामान परिस्थिती असल्यासच शिफारशीनुसार बुरशीनाशकांचा विवेकपूर्ण वापर करावा.

### कीड व्यवस्थापन (एकात्मिक कीड व्यवस्थापन - आयपीएम)

- **नियमित शेत पाहणी करा:** फुलकिडे, मावा, तुडतुडे, लाल कोळी यांसारख्या रसशोषक किडी तसेच बोंडअळींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी दर आठवड्याला शेताची नियमित पाहणी करावी.

- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करा:** हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रौढ पतंगांच्या हालचालींचे निरीक्षण व अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेण्यासाठी फेरोमोन सापळे लावावेत. तसेच कीड व्यवस्थापनासाठी प्रथम प्राधान्याने सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा वापर करावा.
- **नैसर्गिक शत्रू कीटकांचे संवर्धन करा:** लेडीबर्ड भुंगेरे, लेसविंग आणि बिग-आयड बग यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संवर्धन करण्यासाठी व्यापक परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक कीटकनाशकांची निवड करावी.
- **रासायनिक कीटकनाशकांचा मर्यादित वापर करा:** रासायनिक कीटकनाशकांचा वापर हा शेवटचा पर्याय म्हणूनच करावा किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळी गाठल्यानंतरच लेबलवरील शिफारशीनुसार योग्य रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा.

## बी. स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुलै | | | | | | | जुलै/ ऑगस्ट | | | | |
| | | 28 | 29 | 30 | 31 | 01 | 02 | 03 | 05 | 06 | 07 | 08 | 09 |
| | धुळे | | | | | | | | 1 | 0.6 | 0.8 | 0.7 | 0.7 |
| | नंदुरबार | | | | | | | | 2.1 | 1.9 | 1.5 | 1.2 | 0.9 |
| | जळगाव | 10 | 0 | 1 | 160 | 39 | 0 | 0 | 0.9 | 0.6 | 1.1 | 1.4 | 1 |
| | अहमदनगर | 0 | 0.4 | 1.6 | 15.4 | 6.8 | 0.3 | 1.3 | 1.3 | 0.8 | 1 | 1 | 0.9 |
| | औरंगाबाद | | | | | | | | 1 | 0.4 | 0.9 | 0.9 | 1 |
|  | जालना | | | | | | | | 1.4 | 0.5 | 1 | 0.9 | 1.3 |
| | बीड | 0 | 0.8 | 0 | 0 | 0 | 0 | | 1.4 | 0.7 | 0.7 | 0.7 | 0.8 |
| | नांदेड | | | | | | | | 1.7 | 0.8 | 1.5 | 2.2 | 2.6 |
| | परभणी | 1.7 | 1 | 31.1 | 92 | 0 | 0 | 0 | 1 | 0.6 | 1.1 | 1.2 | 2 |
| | हिंगोली | | | | | | | | 1.6 | 1 | 3.3 | 2.1 | 2.2 |
| | बुलढाणा | 4 | 4 | 14 | 128 | 24 | 1 | 0 | 0.9 | 0.7 | 1.3 | 1.5 | 1.2 |
| | अकोला | 2 | 6 | 6.6 | 96 | 26 | 11 | 0 | 0.6 | 0.6 | 1.9 | 1.7 | 0.2 |
| | वाशीम | 0.4 | 0 | 23.6 | 112 | 0 | 0 | 0 | 0.7 | 1.1 | 2.4 | 1.3 | 0.8 |
| | अमरावती | 2 | 3.6 | 37 | 111 | 3.6 | 12 | 1 | 1.3 | 1 | 1.6 | 1.9 | 1.3 |
| | यवतमाळ | 0 | 9 | 32 | 142 | 2.6 | 0 | 2 | 1 | 1.1 | 1.7 | 1.4 | 1.8 |
| | वर्धा | 1.2 | 10.2 | 9.6 | 160 | 1 | 6 | 0 | 2.9 | 1.6 | 1.4 | 1.6 | 0.8 |
| | नागपूर | 1.4 | 187 | 9.7 | 52.6 | 7 | 5.8 | 0 | 5.3 | 4.8 | 4.3 | 2.9 | 0.8 |
| | चंद्रपूर | 3 | 20 | 122 | 25 | 35 | 6 | 0 | 4.4 | 4.4 | 4.2 | 2.5 | 2.9 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | | 64.5 to 115.5 मिमी | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | | मुसळधार पाऊस | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक स्थिति:**

**अकोला येथे**, पेरणी केलेले कापूस पीक २९ ते ३४ दिवसांचे असून शाखिय वाढीच्या अवस्थेत आहे. पिकामध्ये विरळणी, कोळपणी व तणनियंत्रणाची कामे करण्यात आली असून तणग्रस्त शेतांमध्ये तणनाशकांची फवारणीही सुरू आहे. अहवाल कालावधीत मध्यम ते जोरदार पाऊस झाला. कापूस शेतांमध्ये नागरमोथा यासारख्या गवतवर्गीय तणांसह काही रुंद पानांच्या तणांचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. तसेच काही शेतांमध्ये कानेरी या तणाचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत असून उशिरा पेरणी केलेल्या कापूस पिकामध्ये तणांचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळत आहे. काही शेतांमध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव

दिसून आला असला तरी तो आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी आहे. विशेषतः कापूस पिकामध्ये तुडतुडे या किडीचा प्रादुर्भाव काही प्रमाणात आढळून आला आहे.

**राहुरी येथे**, सिंचनाखालील पेरणी केलेले कापूस पीक पेरणीच्या कालावधीनुसार २९ ते ६४ दिवसांचे असून शाकीय वाढ, पाते (स्क्वेअर) धारण व फुलधारणा या अवस्थेत आहे. पिकामध्ये सिंचन, तणनियंत्रण, कीडनियंत्रणासाठी फवारणी तसेच खतांची मात्रा देण्याची कामे सुरू आहेत. शेतांमध्ये कॉंग्रेस गवत, हरळी, लव्हाळा, दुधी, केना, नागरमोथा, चांदवेल इत्यादी तणांचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. अनेक शेतांमध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी ओलांडलेला आहे. तसेच मायलोसेरस भुंगा यामुळे सुमारे १ ते ३ टक्के कापूस झाडांचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी गुलाबी बोंडअळी, ठिपकेदार बोंडअळी तसेच तंबाखू रेषांकित विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

**नांदेड येथे**, पेरणी केलेले कापूस पीक ३२ ते ५७ दिवसांचे असून शाखिय वाढीच्या अवस्थेत आहे. पिकामध्ये आंतरमशागतीची कामे, तणनियंत्रण, खतांचा पुरवठा तसेच पीक संरक्षणाची कामे सुरू आहेत. शेतांमध्ये हराळी, सावा, कोद्रा यांसारख्या गवतवर्गीय तणांचा तसेच माठ, कुलफा, बथुआ, हिरणखुरी, कॉंग्रेस गवत, भुईआवळी, गाडरदगडी या रुंद पानांच्या तणांचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. तसेच हरळी व नागरमोथा या तणांचाही प्रादुर्भाव शेतांमध्ये दिसून येत आहे. कापूस पिकामध्ये तुडतुडे, फुलकिडे व मावा यांचा प्रादुर्भाव काही ठिकाणी आढळून आला असला तरी तो आर्थिक नुकसान पातळी पेक्षा कमी आहे. सध्या कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

**पिकसल्ला:**

अकोला येथे, कापूस पिकाच्या फुलधारणा अवस्थेत असतांना २% युरियाची फवारणी करावी व पेरणीनंतर ४५ दिवसांनी पहिली फवारणी करावी. जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी शेतात सऱ्या उघडाव्यात. ज्या भागात अतिवृष्टी झाली आहे त्या ठिकाणी शेतातील अतिरिक्त पाण्याचा त्वरित निचरा करावा. काही शेतांमध्ये पॅरा विल्ट (अचानक कोमेजणे) या समस्येची लक्षणे दिसून आली असल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डबल्युपी @ २५ ग्रॅम + युरिया १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या द्रावणाने झाडांच्या बुंध्याजवळ आळवणी (ड्रेंचिंग) करावी. लक्षणे कायम राहिल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डबल्युपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझीम ५० डबल्युपी @ १२० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची लक्षणे दिसल्यानंतर त्वरित सुरुवात करून एक आठवड्याच्या अंतराने २-३ आळवण्या कराव्यात. कापूस शेतात गवतवर्गीय व रुंद पानांच्या तणांचा प्रादुर्भाव आढळत असल्याने रुंद पानांच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरीथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १२.५ ते १५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी, गवतवर्गीय तणांच्या नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथाईल ५% ईसी @ १५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी, अथवा सर्व प्रकारच्या तणांच्या प्रभावी नियंत्रणासाठी पायरीथिओबॅक सोडियम ६% ईसी + क्विझालोफॉप इथाईल ४% ईसी @ २०-२५ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या तणनाशकांची फवारणी करावी. तसेच कोळपणी व निंदणीसारखी आंतरमशागतीची कामे वेळेवर करावीत. सिंचित संकरित कापसासाठी पहिल्या हप्त्यात ४० किलो नत्र (९० किलो युरिया/हेक्टर) तर कोरडवाहू संकरित/हिर्सुटम कापसासाठी ४५ किलो नत्र (सुमारे ९७ किलो युरिया/हेक्टर) वरखत म्हणून द्यावे. मावा, तुडतुडे व फुलकिडे या रसशोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्क (NSKE) + ५ मि.ली. निंबोळी तेल/लिटर किंवा ३०० किंवा १५०० पीपीएम क्षमतेच्या निंबोळी-आधारित तयार औषधांची ५ मि.ली./लिटर + १ ग्रॅम धुण्याचा साबण (डिटर्जंट) प्रति लिटर पाणी यांची फवारणी करावी. यामुळे गुलाबी बोंडअळीच्या मादी पतंगांना कापसाच्या पात्यांवर अंडी घालण्यापासूनही प्रतिबंध होतो. गुलाबी बोंडअळीच्या नियमित निरीक्षणासाठी प्रति एकर २ कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप) लावावेत. तसेच किडींच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण करण्यासाठी प्रति एकर २० झाडांची नियमित पाहणी करावी.

राहुरी येथे, शेतकऱ्यांनी कापूस पिकामध्ये पेरणीनंतर ३० दिवसांनी युरियाचा पहिला डोस व ६० दिवसांनी दुसरा डोस द्यावा. पीक तणमुक्त ठेवण्यासाठी वेळेवर कोळपणी, निंदणी तसेच ट्रॅक्टर किंवा बैलचलित अवजारांद्वारे आंतरमशागतीची कामे करावीत. कॉंग्रेस गवत शेतातून व बांधावरून पूर्णपणे नष्ट करावे, त्यामुळे तंबाखू रेषांकित विषाणू (TSV) रोग व फुलकिडे (थ्रिप्स) यांचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होते. वार्षिक गवतवर्गीय व रुंद पानांच्या तणांच्या नियंत्रणासाठी पहिल्या

पाण्यानंतर उगवणीनंतरच्या अवस्थेत पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाईल ४% @ १२५० मि.ली./हेक्टर २०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रसशोषक किडींच्या प्रादुर्भावावर नियमित लक्ष ठेवावे. त्यांच्या निरीक्षणासाठी पिवळे चिकट सापळे लावावेत तसेच ५% निंबोळी अर्क (NSKE) किंवा अॅझाडिरॅक्टिन १०००० पीपीएम @ १० मि.ली./१० लिटर पाणी यांची फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी (ETL) ओलांडल्यास फ्लोनिकॅमिड ५० डबल्युजी @ २ ग्रॅम/१० लिटर पाणी किंवा बुप्रोफेझिन २५ एससी @ २० मि.ली./१० लिटर पाणी यापैकी एका कीटकनाशकाची फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे लावावेत. उच्च घनतेची लागवड पद्धत (९० × १५ से.मी.) किंवा जवळची लागवड (९० × ३० से.मी.) स्वीकारलेल्या शेतकऱ्यांनी पिकाची वाढ नियंत्रित करण्यासाठी मेपिक्वॉट क्लोराईड ५% एएस @ १ मि.ली./लिटर पाणी याची पहिली फवारणी ४०–४५ दिवसांच्या पिकावर किंवा पाते (स्क्वेअर) लागण्याच्या अवस्थेत करावी व १५ दिवसांनी १.२ मि.ली./लिटर पाणी या प्रमाणात दुसरी फवारणी करावी. ज्या शेतकऱ्यांना वाढ नियंत्रकाची फवारणी करायची नसेल त्यांनी पेरणीनंतर ४५ दिवसांनी मोनोपोडिया (बाजूच्या फांद्या) काढून टाकाव्यात व ७५–८० दिवसांनी शेंडेखुडणी (डी-टॉपिंग) करावी. पॅरा विल्ट (अचानक कोमेजणे) ची लक्षणे दिसून आल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डबल्युपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझीम ५०% डबल्युपी @ १२० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची लक्षणे दिसल्यानंतर त्वरित सुरुवात करून एक आठवड्याच्या अंतराने २–३ आळवण्या (ड्रेंचिंग) कराव्यात.

नांदेड येथे, शेतकऱ्यांनी तणांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी कोळपणी, निंदणी व आंतरमशागतीची कामे वेळेवर करावीत. तणे २–४ पानांच्या अवस्थेत असताना पायरीथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथाईल ४% @ १०६० मि.ली./हेक्टर या उगवणीनंतरच्या तणनाशकाची फवारणी करावी. पेरणीच्या वेळी खतांची मात्रा दिली नसल्यास, कोरडवाहू कापसामध्ये पाऊस झाल्यानंतर नेहमीच्या अंतरावरील लागवडीसाठी एनपीके @ ४८:६०:६० कि.ग्रॅ./हेक्टर तसेच उच्च घनतेच्या लागवड पद्धतीत एनपीके @ ४८:७५:७५ कि.ग्रॅ./हेक्टर या प्रमाणात पेरणीच्या ओळीमध्ये (ड्रिलिंगद्वारे) द्यावे. सिंचित कापूस पिकास पेरणीनंतर ६० दिवसांनी ६० कि.ग्रॅ. नत्र/हेक्टर तर कोरडवाहू कापूस पिकास पेरणीनंतर ३० दिवसांनी ४८ कि.ग्रॅ. नत्र/हेक्टर ड्रिलिंग किंवा रिंग पद्धतीने वरखत म्हणून द्यावे. युरियाची भुरकावणी (ब्रॉडकास्टिंग) टाळावी. रसशोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी पेरणीनंतर ३० दिवसांनी ५% निंबोळी अर्क (NSKE) फवारावा. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी (ETL) ओलांडल्यास बुप्रोफेझिन २० एससी @ १००० मि.ली./हेक्टर किंवा डायनोटेफ्युरॉन २० एसजी @ १५० ग्रॅम/हेक्टर यापैकी एका कीटकनाशकाची फवारणी करावी. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तणांच्या नियंत्रणासाठी पेंडामेथालिन ३८.७ % सीएस @ ७०० मि.ली./एकर २०० लिटर पाण्यात मिसळून उगवणीपूर्व फवारणी करावी. शेत व शेताचे बांध तणमुक्त ठेवावेत तसेच कॉंग्रेस गवत शेतात व शेताभोवती पूर्णपणे नष्ट करावे, त्यामुळे फुलकिडे (थ्रिप्स) यांची संख्या वाढण्यास प्रतिबंध होऊन तंबाखू रेषांकित विषाणू (TSV) रोगाचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. पॅरा विल्ट (अचानक कोमेजणे) ची लक्षणे दिसून आल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डबल्युपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझीम ५०% डबल्युपी @ १२० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची लक्षणे दिसल्यानंतर त्वरित सुरुवात करून एक आठवड्याच्या अंतराने २–३ आळवण्या (ड्रेंचिंग) कराव्यात.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc., can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google play store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisory are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.

**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. G. T. Behere | Dr. A. S. Tayade | Dr. A. H. Prakash | Dr. S.K. Verma |
| Dr. S.K. Sain | Dr. Rishi Kumar | Dr. Babasaheb B. Fand | Dr. Ramkrushna GI |
| Dr. S.P Gawande | Dr. Shivaj Thube | Dr. R.R. Chapke | |

**Regional language translation**:

| | |
|---|---|
| **Hindi** | : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra |
| **Punjabi** | : Dr Amarpreet Singh |
| **Tamil** | : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan |
| **Telugu** | : Dr L. Rajesh Chaudhary |
| **Marathi** | : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge |
| **Gujrati** | : Dr H R. Desai & Dr Vivek Shah |
| **Oriya** | : Dr B. S. Nayak |
| **Kannada** | : Dr Neelkanth Hiremani |